प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

पुढारी

www.pudhari.com




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सहायक पोलिस निरीक्षक रामचंद्र पवार आदी.

# विद्यार्थ्यांनी मोबाईल, रॅगिंगपासून दूर राहावे : स.पो. निरीक्षक पवार

**कन्नड पुढारी वृत्तसेवा :** माध्यमिक विद्यालय तथा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोबाईल आणि रॅगिंगसारख्या घातक बाबीपासून स्वत:ला दूर ठेवावे. आकस्मिकपणे एखादा गुन्हा घडल्यास भविष्यात नोकरीचे दरवाजे बंद होतात, याची जाणीव ठेवावी, असे आवाहन कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक रामचंद्र पवार यांनी केले.

तालुक्यातील कुंजखेडा येथील उमरबीन खत्ताब वेलफेअर संस्थेच्या वतीने युनूस फजलानी युनानी वैद्यकीय महाविद्यालयात, 'रॅगिंगमुक्त वातावरण आणि मोबाईल वापराचे फायदे - तोटे' या विषयावर ते बोलत होते.

पवार म्हणाले, की मोबाईल वापराचे जेवढे फायदे आहेत तेवढेच तोटेही आहेत.अनेक जण मोबाईलचा वापर चुकीच्या कामासाठी करतात. खूपच आवश्यकता असेल तर मोबाईल वापरणे योग्य आहे. महाविद्यालयातील वातावरण हे रॅगिंग मुक्त वातावरण असायला हवे. महाविद्यालयात शिक्षण घेताना विद्यार्थ्यांनी मिळून मिसळून वागावे. एकमेकांना कमी लेखू नये. उमर बीन खत्ताब वेलफेअर संस्थेचे अध्यक्ष फारूक रंदेरा यांच्या संकल्प-नेतून साकारलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष फारुख रंदेरा यांची उपस्थिती होती. मौलाना आझाद महाविद्यालयाचे वनस्पती शास्त्र विभागप्रमुख डॉ. अथरुद्दीन कादरी, शौकतली साहेब तसेच प्रो. एल. एल. पी. चे शेख समद यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी आलेल्या पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या प्रसंगी संस्था प्रतिनिधी व मुख्याध्यापक शरीफ बेग, युनानी महाविद्यालयाचे प्र. प्रा. इम्रान पठाण, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य मुझम्मिल शेख, डॉ. काझी इमाद ,बी. एड. व डी . एड. चे डॉ. चिराग, जलील, डॉ. मलिक तौहीद, अब्दुल कय्युम, शोएब शाह, फिरोज शेख, जामिलूर रहमान, कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन जहीर पटेल यांनी केले तर डॉ. अब्दुल रहमान यांनी आभार मानले.

